।। ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ।।

# ज्योतिर्विद्‍या परिसंस्था, पुणे

## वार्षिक कार्यवृत्तांत - २००८-०९ - वर्ष ६५ वे

स्थापना - श्री गणेशचतुर्थी शके १८६६, ता. २२ ऑगस्ट १९४४

टिळक स्मारक मंदिर, टिळक रस्ता, पुणे ४११०३०

भारतातील हौशी खगोलनिरीक्षकांची पहिली संस्था

# <u>२००८-०९ वर्षाचा कार्य आढावा</u>

ज्योतिर्विद्या परिसंसथेच्या २००८-०९ या वर्षाचा कार्याचा वृत्तांत सादर करण्यास प्रशासक मंडळास आनंद होत आहे.

मावळत्या प्रशासक मंडळातील खालील सभासद व त्यांच्याकडे असलेले कामाचे स्वरूप खालील प्रमाणे होते.

अध्यक्ष- श्री. शेखर फाटक

उपाध्यक्ष- श्री. मुजतबा लोखंडवाला

कार्यवाह- श्री. दीपक जोशी

सदस्य-

१) श्री. अनिरुद्ध देशपांडे

२) श्री. शैलेश टिळक

३) श्री. अमोद रायरीकर

४) श्री. अमित कडलासकर

५) कु. रूचा कुलकर्णी

६) श्री. अक्षय शिरसीकर

७) श्री. परिमल दवे

८) सौ. केतकी दवे

मावळत्या प्रशासक मंडळातील सदस्यांनी वेळात वेळ काढुन जे काही परीसंस्थेसाठी काम केले त्याबद्दल त्यांचे आभार.

**२००८-०९ या वर्षात परिसंस्थे तर्फ़े खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.**

१) दि.२६ नोव्हेंबर २००८ रोजी केसरी वाडा येथुन शुक्र कोर दर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याला सुमारे ५०० लोक उपस्थित होते.

२) रोटरी क्लब पुणे यांचा करीता मुळशी येथे दि. २७ डिसें. २००८ रोजी आमंत्रित आकाशदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

३) दि. २ डिसें. २००८ रोजी स्त्री मुक्ती केंद्रा तर्फ़े मालोजी आम्बेडकर विद्यालय, रामवाडी येथे आमंत्रित आकाशदर्शन कार्यक्रम करण्यात आला.या कार्यक्रमास श्री. अमित कडलासकर यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे वृत्त दि.३ डिसें. २००८ च्या सकाळमध्ये प्रसिद्ध करण्यात आले.

४)आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र वर्षानिमित्त दि.१ जाने. ०९ रोजि पुण्यातील वर्तक बागेतुन आकाशदर्शन कार्यक्रम करण्यात आला.या कार्यक्रमास श्री. गोपाळकृष्णन यांची उपस्थिती होती. याच प्रकारे संभाजी पूल, स. म. जोशी पूल, झेड ब्रीज इत्यादि पूलांवरून दूर्बीणीने आकाश दाखवण्याचा कार्यक्रम करण्यात आला. यास लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

५) दि. ११ फ़ेब्रूवारी २००९ रोजी टिळक स्मारक मंदिरात श्री. रॉबर्ट बेसॉ यानी “Around World Around Sky” या विषयावर फ़िल्म दाखविली. या कार्यक्रमास सुमारे १०० लोक सहभागी होते.

**आकाश दर्शन कार्यक्रम**

२००८-०९ या वर्षांमध्ये खालील तारखांना आकाश दर्शन कार्यक्रम आयोजित केले.

| दिनांक | स्थळ | सहभागी व्यक्ती |
|---|---|---|
| ५.४.२००८ | निसर्गराजा | ५५ |
| १०.५.२००८ | निसर्गराजा | ९० |
| २९.११.२००९ | निसर्गराजा | ५५ |
| २७.१२.२००९ | निसर्गराजा | ३० |
| २४.१.२००९ | निसर्गराजा | ३६ |
| २१.२.२००९ | निसर्गराजा | ४३ |

| | | |
|---|---|---|
| २८.३.२००९ | निसर्गराजा | ५० |

**सभासद**

१ एप्रिल २००८ - ३१ मार्च २००९ या कालावधीत खालील प्रमाणे संस्थेचे सभासद झाले.
आज़ीव सभासद - ५
सामान्य सभासद- नवीन - ७०, नुतनीकरण - ८, एकूण = ७८
ग्रंथालय सभासद - नवीन - ७, नुतनीकरण - ६, एकूण = १३

या वर्षात श्री. मुकुंद गणेश बर्वे यांच्यातर्फ़े संस्थेला ६० मिमि. Refractor Telescope भेट दिल्याबद्दल त्यांचे आभार.